चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

२५ फेब्रुवारी, २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

## चंद्रपूर पोलीसांची अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कार्यवाही

जिल्हयात दारूबंदी घोषीत झाल्यापासुन अवैध दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्यांवर चंद्रपूर जिल्हा पोलीस प्रभावी कार्यवाही करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहे. यादरम्यान दिनांक २४/०२/२०१९ रोजी जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत नाकेबंदी आणि छापे टाकुन अवैध दारूचा साठा जप्त करण्यात पोलीसांना यश प्राप्त झाले आहे.

यामध्ये जिल्हयातील पोलीस स्टेशन **रामनगर, दुर्गापुर, वरोरा, भद्रावती, शेंगाव, मुल, सिंदेवाही, धाबा, टेकामांडवा** अंतर्गत संबधीत पोलीस पथकाने प्रभावी कार्यवाही करीत दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्याच्या विरूध्द जिल्हयात एकुण **२४** गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन **१४** आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयात एकुण **२,०२,५००/—रू.** चा मुदद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढिल तपास संबंधीत पोलीस स्टेशन करीत आहे.

---

## चंद्रपर पोलीसांची जुगार खेळणाऱ्यांवर कार्यवाही

**१) पोलीस स्टेशन रामनगर :—**

दिनांक **२४/०२/२०१९** रोजी पोलीस स्टेशन **रामनगर** अंतर्गत इंदीरा नगर चंद्रपुर येथे ०६ आरोपी हे ५२ ताश पत्यावर पैशाची बाजी लावुन जुगारचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **रामनगर** येथे अप. क्र. **२१२/२०१९** कलम १२ मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ०६ आरोपीस अटक करण्यात आले असुन घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यासह नगदी असा एकुण **१७,६९०/—रू.** चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **रामनगर** पोलीस करीत आहे.

---

☎ : 07172-264300
📠: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
✍: 7276494810 (PRO)

**२) पोलीस स्टेशन वरोरा :—**

दिनांक २४/०२/२०१९ रोजी पोलीस स्टेशन **वरोरा** अंतर्गत मौजा सुराणा येथे ०३ आरोपी हे ५२ ताश पत्यावर पैशाची बाजी लावुन जुगारचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **वरोरा** येथे अप. क्र. २०२/२०१९ कलम १२ मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयात घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यासह नगदी असा एकुण ४५५/—रू. चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **वरोरा** पोलीस करीत आहे.

---

**३) पोलीस स्टेशन नागभिड :—**

दिनांक २४/०२/२०१९ रोजी पोलीस स्टेशन **नागभिड** अंतर्गत मौजा वासाळा मक्ता येथे ०८ आरोपी हे कोबंडयाच्या झुंजीवर पैशाची बाजी लावुन खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **नागभिड** येथे अप. क्र. ५८/२०१९ कलम १२ मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ०८ आरोपीस अटक करण्यात आले असुन घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यासह नगदी असा एकुण २,०९,२६०/—रू. चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **नागभिड** पोलीस करीत आहे.

---

**३) पोलीस स्टेशन पाथरी :—**

दिनांक २४/०२/२०१९ रोजी पोलीस स्टेशन **पाथरी** अंतर्गत मौजा चिखली येथे ०७ आरोपी हे कोबंडयाच्या झुंजीवर पैशाची बाजी लावुन खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **पाथरी** येथे अप. क्र. २७/२०१९ कलम १२ मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयात घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यासह नगदी असा एकुण २३,०९०/—रू. चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **पाथरी** पोलीस करीत आहे.

---

☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7276494810 (PRO)

# स्थानिक गुन्हे शाखेची अवैध दारू तस्करीवर कार्यवाही

## एका आरोपीसह १५ लक्ष ८२ हजाराचा मुद्देमाल हस्तगत.

दिनांक १०/०१/२०१९ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक सिंदेवाही पोलीस स्टेशन परिसरात पेट्रोलींग करीत असतांना गोपनीय माहिती मिळाली की, नवरगाव मार्गे सिंदेवाही येथे एका पांढऱ्या महिंद्रा स्कॉर्पिओ वाहनाने काही इसम अवैध दारूची तस्करी करणार आहे. अशी माहिती मिळताच पोलीस पथकाने सिंदेवाही मेन रोडच्या कडेला सापळा रचला असता, मिळालेल्या माहितीच्या वर्णनाप्रमाणे एक स्कॉर्पिओ वाहन येतांना दिसले सदर वाहनास थांबविण्याचा प्रयत्न केला असता वाहन न थांबता पुढे निघुन गेले. पोलीस पथकाने सदर वाहनास गुंजेवाही रोडवरील जंगलपरिसरातुन ताब्यात घेतले. वाहनाची तपासणी केली असता वाहनामध्ये एक इसम मिळुन आला तर एक इसम अंधाराचा फायदा घेवुन पसार झाला होता. सदर वाहनाची झडती घेतली असता वाहनामध्ये १०० पेटया देशी दारू किं. १०,००,०००/—रू, ५ पेटया विदेशी दारू इम्पेरीयल ब्ल्यु किं. ७२,०००/—रू, एक महिंद्रा स्कॉर्पिओ वाहन क्र. एम.एच. ३१ डी. के २९५५ किं. ५,००,०००/—रू आणि एक मोबाईल फोन असा एकुण १५,८२,०००/—रू चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन सिंदेवाही येथे नोंद करण्यात आला असुन आरोपी नामे सुदर्शन उर्फ दर्शन राजु किन्नाके वय २२ रा. शास्त्री वार्ड, हिंगणघाट वर्धा यास अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही ही डॉ. महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांचे मार्गदर्शनाखाली स्थागुशा प्रभारी पोनि. श्री. ओ. जी. कोकाटे यांचे नेतृत्वात पोउपनि जितेंद्र वैरागडे, पोहवा संगीडवार, पोशि अविनाश दशमवार, पोशि अमजद खान यांनी पार पाडली.

---

# वरोरा पोलीसांची अवैध दारूतस्करींवर विशेष कार्यवाही
# एकाच दिवशी दारूबंदीच्या १५ गुन्हयाची नोंद

पोलीस स्टेशन वरोरा यांनी दारूबंदी सदरखालील गुन्हयाअंतर्गत एकुण १५ गुन्हयांची नोंद करून दोन लक्षच्या वर अवैध दारूचा मुद्देमाल जप्त केला.

दिनांक २४/०२/२०१९ रोजी पोलीस स्टेशन वरोरा येथील प्रभारी अधिकारी यांनी आपल्या पोलीस पथकासह वरोरा पोलीस स्टेशन हद्दीत अवैध दारूतस्करीवर धाड सत्र राबवित एकुण १३ आरोपींना हवालात बंद केले. यामध्ये वरोरा येथील यात्रा वार्ड येथे, आशिर्वाद नगर, टेमुर्डा, जगन्नाथबाबा नगर येथे मोठया प्रमाणात अवैध दारूचा साठा मिळुन आला. अटक आरोपींविरूध्द पोलीस स्टेशन वरोरा येथे दारूबंदी कलम ६५ ई मदाका अन्वये गुन्हे नोंद करण्यात आले असुन एकुण २५७५ नग अवैध देशी विदेशी दारू किं. २ लक्ष ७९ हजार ९०० चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही डॉ. महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांचे मार्गदर्शनाखाली वरोरा पोलीस स्टेशन प्रभारी पोनि. श्री. उमेश पाटील यांचे नेतृत्वात पोउपनि मिश्रा, घागे, सफौ. पेंढारकर, पोहवा. रमेश, नापोशि. मदन, दिपक, पोशि नागोसे, मेश्राम, एकनाथ यांनी पार पाडली.

---